**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**
**ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- ४२२ २२२**

# २०१२ कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार के. सच्चिदानंदन ह्यांना जाहीर

**नाशिक दि.१३** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत दरवर्षी देण्यात येणारा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ मल्याळी कवी श्री. के. सच्चिदानंदन यांना जाहीर करण्यात आला आहे.

श्री. के.सच्चिदानंदन हे मल्याळीतील ज्येष्ठ कवि असून त्याच्या काव्यातून त्यांनी मल्याळी परंपरेतील कवितेला एक वेगळे वळण दिले आहे. के. सच्चिदानंदन यांची कविता गेल्या ३०-४० वर्षातील भारतीय सामाजिक - राजकिय घटनांचे संदर्भ आणि त्यांचे चिंतनशील विश्लेषण करते. मानवी आस्थेला के. सच्चिदानंदन यांनी आपल्या कवितामध्ये महत्वाचे स्थान दिले असून त्यांची कविता एका विचारधारेशी संप्रदायाशी बांधलेली नाही. मानवतावाद ऊदारमतवाद, बहुसांस्कृतिकता आणि नैतिकतेची जाणीव यांनी त्यांचे काव्य ओतप्रोत भरलेले आहे.

के. सच्चिदानंदन या पहिला कवितासंग्रह **अंचुसूर्यन (पाच सूर्य)** १९७० मध्ये प्रकाशित झाला आणि मल्याळी काव्यजगतातील एक महत्वाची घटना म्हणून त्याकडे पाहिले जाते. त्यानंतर **इवान्नेक्कुडी** ( त्याला सुद्धा) **मलयालम, साक्ष्यंगळ** असे त्यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले आहे. याशिवाय त्यांच्या कविता फ्रेंच, इटालियन, जर्मन, अरेबीक, चिनी आणि स्पॅनिश भाषेत अनुवादित झालेल्या आहेत. के. सच्चिदानंदन हे उत्कृष्ट अनुवादक असून त्यांनी आत्तापर्यंत आंतरराष्ट्रीय व भारतीय कवितांची १९ पुस्तके मल्याळीत प्रकाशित केली आहेत. आतापर्यंत त्यांनी २१ आंतरराष्ट्रीय कविता समारोहात काव्यवाचन करून भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यात पोलंड आणि इटली यांनी दिलेले सन्मान विशेष महत्वाचे आहेत. विषेश उल्लेखनीय म्हणजे २०११ च्या नोबेल पुरस्काराच्या यादीत त्यांचे नांव बऱ्याच वरच्या क्रमाने चर्चिले गेले होते.

पुरस्कार निवड समितीचे सदस्य म्हणून डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ.सतीश काळसेकर व प्रा. डॉ. निशिकांत ठकार यांनी काम पाहिले. यापूर्वी हा पुरस्कार कन्नड साहित्यिक श्री. जयंत कायकिणी आणि ज्येष्ठ हिंदी साहित्यिक श्री. चंद्रकांत देवताळे यांना देण्यात आलेला आहे.

कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचा हा समारंभ मंगळवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी विद्यापीठ प्रांगणात संपन्न होणार आहे. या प्रसंगी डॉ. अशोक वायपेयी, संचालक, कला अकादेमी, भारत सरकार दिल्ली हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. कृष्णकुमार हे भुषविणार आंहेत असे मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे संचालक डॉ. रमेश वरखेडे यांनी कळविले आहे.

